# Index


| | | | |
|---|---|---|---|
| | मान्यवरांचे संदेश, संपादकीय, अनुक्रमणिका | | 3-10 |
| 1 | SOME RELIVANT SOCIAL ISSUES OF INDIA IN CURRENT SCINARIO | Dr. Nilima Dawane | 11-13 |
| 2 | MAJOR SOCIAL ISSUES IN INDIA | Dr. Dayanand U. Raut | 14-15 |
| 3 | Indian social issues and Remedies | Mr. Ravi K. Kyaste | 16-19 |
| 4 | WOMENS EMPOWERNMENT- ISSUES AND GENDER | Asst.Prof. S.N.Thakare<br>Asst.Prof. Nasir Kasam Sheikh | 20-21 |
| 5 | Crime against Women and Causes | Dr. Rahul Narayanrao Hiwrale | 22-24 |
| 6 | DOMESTIC VIOLENCE: A MAJOR GENDER ISSUE IN CURRENT SCINARIO | Dr. Samruddhi Tapare | 25-28 |
| 7 | DEPICTION OF WOMEN IN ELECTRONIC MEDIA: WOMEN ISSUES AND PERSPECTIVE | Ms. Prema Jagdish Verma | 29-33 |
| 8 | स्त्रियांचे प्रश्न आणि स्त्रीमुक्ती चळवळ—एक अध्ययन | प्रा. डॉ. जयमाला लाडे | 34-39 |
| 9 | विदर्भमधील ग्रामीण विकासातील आव्हाने | सहा. प्रा. एन. आर. भिंगारे | 40-43 |
| 10 | मराठी साहित्याचे सामाजिक योगदान | डॉ. दामोदर चंद्रभान दुधे | 44-45 |
| 11 | दलित समाजाच्या समस्या आणि उपाय | प्रा. शाम रा. दुतोंडे | 46-48 |
| 12 | लिंगभेद : एक सामाजिक आव्हान | प्रा. डॉ. संतोष खंडारे | 49-54 |
| 13 | स्त्री आव्हाने आणि लिंगभाव अभ्यास | प्रा. ईश्वर ल. राठोड | 55-57 |
| 14 | बालविकास आणि संशोधन | प्रा.डॉ. अर्चना नारायण धर्मे | 58-59 |
| 15 | शेतकरी महिलांच्या समस्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन | कु. रूपाली विश्वनाथ खराडे | 60-62 |
| 16 | शेतकरी आत्महत्या संदर्भात विविध समित्यांच्या अहवालांचे समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ | 63-68 |
| 17 | कौटुंबिक हिंसाचार : कारणे व उपाय | प्रा. पुरूषोत्तम रा. बांडे | 69-73 |
| 18 | भारतातील सामाजिक समस्या : विश्लेषण व तात्त्विक उपाय | प्रा. डॉ. गजानन एस. फुटाणे | 74-77 |
| 19 | भारतीय परिवेशातील सद्यकालीन सामाजिक सहिष्णुता एक चिकित्सक अध्ययन | डॉ.प्रा. निलिमा सरप | 78-81 |
| 20. | महिलांच्या शैक्षणिक विकासात सावित्रीबाई फुलेंचे योगदान | प्रा. डॉ. बळीराम परशराम अवचार | 82-84 |
| 21 | भारतातील प्रमुख सामाजिक समस्येचे बदलते स्वरूप व उपाय | कु. शितल श्रीकृष्ण दातार | 85-87 |
| 22 | स्त्री समस्या आणि लिंग अभ्यास | स्वप्नील रामभाऊ चिकटे | 88-90 |
| 23 | भारतीय इतिहासात महिलांचे योगदान | प्रा. संकेत सुरेशराव काळे | 91-93 |
| 24 | पश्चिम विदर्भातील शेतकरी आत्महत्येचे वास्तव व सद्य:स्थिती — एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा.डॉ. सुजाता आर. नाईक (गवई) | 94-99 |
| 25 | Current trends in library and information studies: Looking for the User – Centered Approach | Asst. Lib. P. T. Adhao | 100-102 |
| 26 | Old & Recent Trends of Library use in Teaching and Learning Process | Rajesh Gedam | 103-106 |
| 27 | Usage of Electronic-Resources in Academic Libraries and Role of Information Literacy | Prof. Rahul G. Mahure | 107-110 |


Scanned with OKEN Scanner

# स्त्री आव्हाने आणि लिंगभाव अभ्यास

प्रा. ईश्वर ल. राठोड
समाजशास्त्र विभागप्रमुख,
शि. म. ज्ञानदेव माहेकर महाविद्यालय, कळंब

लिंगभाव ही एक अशी संकल्पना आहे की, जी जैविकभेदापेक्षा काहीशी वेगळी आहे. प्रत्यक्षात स्त्री–पुरूषांमधील जैविक भिन्नत्व दर्शविण्यासाठी सेक्स या संकल्पनेचा वापर केला जातो. तर लिंगभाव ही संकल्पना समाजाद्वारे स्त्री–पुरूषांमध्ये निर्माण झालेल्या सामाजिक भिन्नत्वाशी संबंधित असल्याची आढळते. एका अर्थाने लिंगभाव ही संकल्पना स्त्रीत्व आणि पुरूषत्व यांच्या समांतर आणि सामाजिक स्वरूपावर आधारित असलेल्या असमान विभाजनाशी संबंधित आहे, असेच म्हणावे लागेल.

समकालीन भारतीय समाजाचा स्त्री अभ्यास आणि स्त्रियांपुढील आव्हाने हा विषय समजून घेत असतांना आजच्या महिलांवरील होणारे वेगवेगळया प्रकारचे अन्याय, अत्याचार, शोषण फार जटिल स्वरूपाचे आहेत, असे वाटते. आजच्या २१ व्या शतकात महिलांविषयी असे अन्याय होत असतांना दिसून येते की, महिला क्षणांक्षणाला असुरक्षित असल्यासारखेच आहेत, असे सर्वत्र दिसून येत आहे. कारण आज भारतीय महिलांसमोर अनेक आव्हाने असून या क्षणी महिला पूर्णतःहा सक्षम आहे, असे म्हणता येणार नाही. आजच्या भारतीय स्त्रियांपुढे अनेक आव्हाने निर्माण झालेली आहेत. या आव्हानाला समर्थपणे उत्तर देण्याचे कार्य आपल्या स्त्री अभ्यासाच्या माध्यमातून देण्याचे कार्य अनेक विचारवंत व कार्यकर्ते देण्याचे प्रयत्न करीत असतात. परंतु एकूणच भारतीय व्यवस्था ही पुरूषप्रधान संस्कृतीची असल्यामुळे आजही महिलांवर होणारे अन्याय हे सर्रासपणे सर्व ठिकाणी आढळून येत आहे. परंतु अशी व्यवस्था ही देशाच्या विकासातील सर्वात मोठी समस्या ठरू शकते. या करीता संपूर्ण समाजव्यवस्थेत स्त्रीविषयक असलेली नकारात्मक विचारसरणी बदलणे गरजेचे आहे.

'फेमिनीस्ट' या शब्दाचा शोध प्रसिद्ध फ्रेंच सामाजिक विचारवंत 'चार्ल्स फेरियर' यांनी १९०० व्या शतकात लावला. सुरुवातीला हा शब्द केवळ मतदानाचा भाग म्हणून वापरला जात असे. पण आता याकडे विस्तारित स्वरूपात पाहिले जात आहे. जगातील महिलांच्या खास चळवळी म्हणून याकडे लक्ष केंद्रीत होते. अन्यायाला विरोध करणे, हे या चळवळीचे उद्दिष्ट आहे. यासाठी जागतिक पातळीवर स्त्रीसंघटना निर्माण झाल्या. हे स्त्री संघटन कमी अधिक प्रमाणात असेल, पण या सर्वांचा एकच हेतू तो म्हणजे अन्यायाला विरोध करणे होय. सर्व समाजातील स्त्रियांना आपल्यावरील अन्यायाची जाणीव होऊन यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला जातो. स्त्रीहक्क चळवळीचा हल्ला हा मानवी संस्कृतीला विकृत रूप देणाऱ्या आणि बनवणाऱ्या घटकांवर आहे. अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांचा आवाज उठविण्यासाठी स्त्रीहक्क चळवळ समाजात निर्माण होऊन स्त्रियांच्या हक्कांच्या लढ्यत उतरलेली दिसून येते. हीच महिलांच्या सक्षमीकरणाची प्रक्रिया होय. इ.स. १९७५ नंतर स्त्री चळवळीने जहालवादी भूमिका सांस्कृतिकतेच्या भोवती उभी केली जी स्वातंत्र पुर्व चळवळीतील स्त्रीयांनी घेतलेली नव्हती.

१९७५ हे साल सबंध जगभरच एका नव्या क्रांतीचे वातावरण निर्माण करवून गेले. अनेक चळवळीतून समाजव्यवस्थेत बदल होत गेले. स्त्रियांचे प्रष्न विष्वव्यापी आहेत हे लक्षात आल्यावर संयुक्त राश्ट्रसंघाने १९७५ हे महिला वर्श आणि ८ मार्च हा महिला दिवस म्हणून घोशीत केला. त्यालाही वस्त्रोद्योगातील गिरणी कामगार स्त्रियांनी केलेल्या चळवळीचा संदर्भ होता.

प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांचा पुरूशांसमान दर्जा असल्याचे दिसुन येते. पुजाविधी, यज्ञ यामारख्या पवित्र कार्यामध्ये स्त्रीयांना बरोबरीने स्थान होते मात्र नंतरच्या काळात बालविवाह, राज्याचा विस्तार, परकिय आक्रमणे, यासारख्या घटनांमुळेअनेक स्थित्यंतरे आलीत. स्त्रीयांना व्यभिचारी व दुराचारी संबोधुन स्त्रीयांच्या अवहेलनेस प्रारंभ झाला. १२व्या षतकानंतर तिचे जीवन अधिकच निम्म दर्जाचे झाले. सतिप्रथा, बालविवाह, केषवपण, पड्दा पध्दती, दासी प्रथा अषा रूढी प्रथांनी तिला अधिकच बंदिस्त केले. यातूनच स्त्रियांचा संपत्तीचा अधिकार नाकारणे षिक्षणापासून वंचित ठेवणे, राजकारणातील सहभाग नाकारणे अषा अनिश्ठ बाबींचा चालना मिळाली. एकंदरीत स्वातंत्र्यपूर्वकाळात स्त्रियांना एक उपभोग्य वस्तू मानून सर्वकश पातळीवरील सहभाग नाकारला.

Scanned with OKEN Scanner

अनेक विचारवंत व समाजसुधारकांनी महिलांना मिळणाऱ्या हिणकस वागणुकीविरूद्ध आवाज उठवून ज्या चळवळी केल्या त्याचा परिणाम म्हणून शासकीय पातळीवर काही सुधारणा कायदे अस्तित्वात आले मात्र सामाजिक व व्यावहारिक पातळीवर या कायद्याची फारशी विधायक फलश्रुती दिसून आली नाही. त्यामुळे निरनिराळ्या सामाजिक संघटना गठीत होऊन जेव्हा सक्रिय झाल्या तेव्हा स्त्रियांच्या मुक्तीची दारे हळूहळू उघडली जाऊ लागली. शासकीय कायदे आणि सामाजिक चळवळी यांचा सुरूवातीचा दृष्टिकोन हा बराचसा मानवतावादी व उदारमतवादी स्वरूपाचा होता. परंतु पुढे जेव्हा महिला वर्ग स्वतःच संघटीत होऊन आपल्या हक्कांची भाषा करू लागले तेव्हा मात्र या प्रश्नांबाबतच्या दृष्टिकोनात समूळ बदल झाला. आता या चळवळीचे स्वरूप स्त्रियांना केवळ विविध जाचक बंधनातून मुक्त करण्यापुरतेच मर्यादित राहिले नसून त्यांना समाजात पुरूषांच्या बरोबरीचे स्थान व दर्जा असणे हा त्यांचा नैसर्गिक हक्क असून त्या हक्काच्या मार्गातील अडथळे दूर करणे आणि त्यांचा लाभ घेण्याची क्षमता त्यांच्यामध्ये निर्माण करणे हा आता या चळवळीचा मूलभूत गाभा बनला आहे. स्त्रियांचे सक्षमीकरण अथवा सबलीकरण कसे करता येईल व त्यासाठी कोणती उपाययोजना करावी लागेल याबाबत वेगवेगळे दृष्टिकोन, पद्धती व कार्यक्रम अस्तित्वात आले असून विविध संस्था व संघटना या प्रश्नावर काम करीत आहेत.

महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया ही स्वातंत्र्योत्तर काळापासून सुरु असल्याचे दिसते. १९२९ बंगाल सतीप्रथा निशेध कायदा पारित झाला. १८५६ ला भारतीय स्त्रीला पुन्हा विवाह करण्यासाठी हिंदू विधवा पुर्णविवाह कायदा पारित झाला. १८६९ महिला षिषु हत्या कायदा, १८७० ला भारतीय विवाह विच्छेद कायदा, १८७२ सुधारित १९५६ विषेश विवाह कायदा, १८८२ सम्पती हस्तातरण कायदा, १९५४ बाल विवाह निशेद कायदा, १९३७ हिंदू महिला सम्पती अधिकार कायदा, १९५६ महिला तथा कन्याओंका अनैतिक व्यापार निषेद कायदा, १९६१ हुंडा प्रतिबंध कायदा, १९७१ चिकित्सक गर्भपात कायदा, १९७६ समान मजुरी कायदा, १९८५ परिवार न्यायालय कायदा, १९८७ सतिप्रथा निवारण कायदा, १९८० स्त्रियांचे अस्लील प्रदर्षन विरोधी कायदा, १९८१ कारखाना कायदा, २००५ कौटूंबिक हिंसाचार विरोधी कायदा पारित झाला. इत्यादी कायद्यावरुन स्पश्ट होते.

ग्रामीण भागात शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्थापन झालेली शेतकरी संघटना कालांतराने स्त्रियांच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध झाली आणि स्त्रियांच्या समस्या सोडविण्यासाठी शेतकरी संघटनेने महिला प्रश्नांकडे आपले लक्ष केंद्रीत केले. एखाद्या मोठ्या संघटनेने 'महिलांचे सबलीकरण' हा आपल्या संघटनेच्या उद्दिष्टाचा भाग ठरविण्याचे प्रयत्न फार क्वचितच झाले आहेत. 'शेतकरी संघटना' ही मात्र या संदर्भात अशी एक संघटना आहे की, जिने आपल्या मूळ उद्दिष्टात महिला सबलीकरणाला स्थान दिले आहे. शेतकरी संघटनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात 'महिला सबलीकरण चळवळ' पोहोचली व त्यातून सबलीकरणाची प्रक्रिया व्यापक झाली.

३ जानेवारी १९८२च्या सटाणा अधिवेशनात शेतकरी महिला प्रश्नांची चर्चा ठेवली. त्यावेळी शेतकरी संघटनेत महिलांच्या सहभागाची आवश्यकता असल्याचे मत मांडले गेले. त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करणे, त्यांचे प्रश्न सोडविण्याची त्यांच्यामध्ये क्षमता निर्माण करणे गरजेचे आहे असे या अधिवेशनाचे मत पडले. शेतकरी स्त्रीचे काही वेगळे प्रश्न आहेत का? हे प्रश्न कसे तयार झाले? त्या प्रश्नांची सुटका काय? या बाबत सविस्तर विचार झाला आणि यातून शेतकरी महिला आघाडीची स्थापना झाली.

मार्क्सवादातील स्त्री विश्लेषणाचा विस्तार शेतकरी संघटनेत झाल्याचे दिसून येते. मानव समाजातील स्त्रियांच्या प्रश्नाचे मूळ आर्थिक घडामोडीत असून त्यामुळे स्त्रियांच्या अन्यायाचा शेवट अपरिहार्यपणे आर्थिक उपायातच शोधला पाहिजे, अशी शास्त्रशुद्ध मांडणी संघटनेच्या विचाराची आहे. महिलांना संपत्तीच्या अधिकाराची जाणीव करून देण्यात शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीने मोठी भूमिका बजावली.

## निष्कर्ष :

1 बचत गट इत्यादींच्या माध्यमातून महिला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र तर झाल्याच पण त्यापेक्षाही महत्वाची बाब म्हणजे बचत गटामुळे महीलांचे संघटन होऊन गावातील विविध समस्या, प्रष्न दारूबंदी सारख्या चळवळी उभारून गावामध्ये सामाजिक क्रांती घडवून आणली.

2 शेतकरी संघटनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात 'महिला सबलीकरण चळवळ' पोहोचली व त्यातून सबलीकरणाची प्रक्रिया व्यापक झाली.

Scanned with OKEN Scanner

3 अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांचा आवाज उठविण्यासाठी स्त्रीहक्क चळवळ निर्माण होऊन स्त्रियांच्या हक्कांच्या लढ्यत उतरलेली दिसून येते.

4 भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये स्त्रियांचा सामाजिक दर्जा वाढवून त्यांच्यात सबलीकरणाची प्रक्रिया निर्माण करण्याचे कार्य सर्वप्रथम भारतीय सामाजिक विचारवंतांनी केले आहे.

5 ७३वी घटनादुरूस्तीद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण लागू केले त्यामुळे महिला ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, ग्रामशिक्षण, समिती इ. स्तरावरील भूमिका महिला समक्षमणे सांभाळत आहेत.

भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये स्त्रियांचा सामाजिक दर्जा वाढवून त्यांच्यात सबलीकरणाची प्रक्रिया निर्माण करण्याचे कार्य सर्वप्रथम भारतीय सामाजिक विचारवंतांनी केले आहे. त्यात प्रामुख्याने म. ज्योतीबा फुले, महर्षि धोंडो केशव कर्वे, राजाराम मोहन रॉय, लोकमान्य टिळक, महात्मा गांधीजी, डॉ. आंबेडकर, राजर्षि शाहू महाराज इत्यादी विचारवंतांनी आपल्या वैचारिक प्रबोधनातून व प्रत्यक्ष कृतीतून सबलीकरणाला सुरुवात केली. म. ज्योतीबा फुलेंनी सावित्रीबाईना प्रथम शिक्षित करून समाजातील स्त्रियांना साक्षर करण्याचा प्रयत्न केला. म्हणजे साक्षरतेतून स्त्रियांमध्ये जाणीव निर्माण करण्याचे काम ज्योतीबांनी केले. त्या काळातील हे पाऊल क्रांतीकारकच ठरले.

१९७५ हे साल सबंध जगभरच एका नव्या क्रांतीचे वातावरण निर्माण करवून गेले. अनेक चळवळीतून समाजव्यवस्थेत बदल होत गेले. स्त्रियांचे प्रष्न विष्वव्यापी आहेत हे लक्षात आल्यावर संयुक्त राश्ट्रसंघाने १९७५ हे महिला वर्श आणि ८ मार्च हा महिला दिवस म्हणून घोशीत केला. त्यालाही वस्त्रोद्योगातील गिरणी कामगार स्त्रियांनी केलेल्या चळवळीचा संदर्भ होता. स्त्रियांच्या प्रश्नाचे मूळ आर्थिक घडामोडीत असून त्यामुळे स्त्रियांच्या अन्यायाचा शेवट अपरिहार्यपणे आर्थिक उपायातच शोधला पाहिजे, अशी शास्त्रशुद्ध मांडणी संघटनेच्या विचाराची आहे. महिलांना संपत्तीच्या अधिकाराची जाणीव करून देण्यात शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीने मोठी भूमिका वजावली. बचत गट इत्यादींच्या माध्यमातून महिला आर्थिकदृष्ट्य स्वतंत्र तर झाल्याच पण त्यापेक्षाही महत्वाची बाब म्हणजे बचत गटामुळे महीलांचे संघटन होऊन गावातील विविध समस्या, प्रष्न दारूबंदी सारख्या चळवळी उभारून गावामध्ये सामाजिक क्रांती घडवून आणली. ७३वी घटनादुरुस्तीद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण लागू केले त्यामुळे महिला ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, ग्रामशिक्षण, समिती इ. स्तरावरील भूमिका महिला समक्षमणे सांभाळत आहेत.

## संदर्भ :

वावर सरोजिनी– स्त्री षिक्षणाची वाटचाल, शिक्षण संचालनालय, महाराश्ट्र षासन, पुणे १९६८
विघुत भागवत– स्त्री प्रश्नांची वाटचाल : परिवतनाच्या दिशेने.
आहुजा राम, सामाजिक समस्याऐ, रावत पब्लिकेषन, जयपूर, नई दिल्ली, १९९४
शरयु अनंतराव, भारतीय समाजांतील स्त्रियांचें स्थान.

❖❖❖

Scanned with OKEN Scanner